# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 14/09/2021 (मंगळवार)
(दुपार)

---

### वेकोली येथील चोरीचा पर्दाफाश मुद्देमालासह आरोपी अटक
### स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कार्यवाही

दि. 05/09/2021 ते दि. 07/09/2021 चे सुमारास अज्ञात आरोपीतांनी वेकोली सिल्लेवाडा येथे बंकर नं. 04 येथील कन्वेयर बेल्ट चालविण्याकरीता इलेक्ट्रीक पोल पासुन ते स्विच रूमपर्यंत तसेच स्विच रूमपासुन कन्वेयर बेल्ट पर्यंत विदयुत पुरवठा करण्याकरीता लावण्यात आलेले आरर्मर केबल 35 मिटर अंदाजे 41,000/- रू चा माल अज्ञात चोरूने नेल्याचे फिर्यादी नामे- संजय देवराव काम्बले (सहा. सुरक्षा उपनिरीक्षक) यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. खापरखेडा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे तपासात स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, सदर चोरी मध्ये सिल्लेवाडा झोपडपट्टी येथील काही युवकांचा समावेश असल्याचे समजल्याने पथकाने साबीर सलीम शेख, वय 19 वर्ष, रा. सिल्लेवाडा झोपडपट्टी यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याच्या 3 इतर साथीदारांसह चोरी केल्याची कबुली दिली. सदर चोरी केलेला माल त्याने आपल्या घरी लपवून ठेवल्याचे सांगितल्याने तो माल जप्त करण्यात आला असून आरोपी साबीर सलीम शेख यास अटक करून पो. स्टे. खापरखेडा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच त्याचे इतर 3 साथीदार फरार असुन त्यांचा शोध घेणे सुरू आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा.पोलीस निरीक्षक अनिल राउत, पोलीस हवालदार नाना राऊत, विनोद काळे, नापोशि अरविंद भगत, शैलेश यादव, पोलीस शिपाई विरेन्द्र नरड, प्रनय बनाफर, चापोहवा भाउराव खंडाते, अमोल कुथे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर